**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती, सभा क्रमांक :-२०**
**सन.२००६-२००७.**

विषय क्रमांक -१ दिनांक २८/२/२००७

ठराव क्रमांक -१ दिनांक२८/२/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा. स्थायी समिती सभा दिनांक २३/१/२००७, दिनांक २/२/२००७, दिनांक ११/२/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- कार्यवृत्त कायम करणे असलेल्या सदर सभा मधील विषय सांगावे.

मा.सहाय्यक आयुक्त श्री.देशमुख साहेब :- दिनांक २३/१/२००७ रोजीचे सभेत दिनांक २०/१२/२००६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आणि खातेनिहाय चौकशी नुसार दोषी असलेल्या चार कर्मचा-यांना बडतर्फे करणे तसेच अहमदनगर महानगरपालिकेचा शहर विकास आराखडा २०३१ चा विकास प्रकल्प आराखडा बनविणे कामी कंन्सलटंट नेमणे बाबत हे विषय होते.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी द्यावी.

मा.श्री. जोशी अ.सु.:-दिनांक २/२/२००७ ची अंदाजपत्रकीय सभा होती कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं :- काचेच्या बांगडयावर जकात माफ करणे बाबत ठरले होते त्याचे काय झाले.

मा.सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख साहेब :- अंदाजपत्रक मा.महासभेने मंजूर केलेले आहे.

मा.श्री. घुले अ.ह.:-कार्यवृत्त कायम करण्यांत यावे.

मा.श्री. बोरूडे अ.व. :- तीन ही सभांचे कार्यवृत्त कायम करणेत यावे.

मा.श्री.जोशी अ.सु. व मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- दिनांक ११/२/२००७ रोजीच्या सभे मध्ये मंजूर झालेला ठराव वाचून दाखवावा.

त्या प्रमाणे मा.स्थायी समिती सभा दिनांक ११/२/२००७ रोजीचे सभेचा ठराव वाचून दाखविण्यांत आला.

मा. श्री.त्रिपाठी सु.चं. :- सदरचा ठराव जकात विभागाकडेस कधी पाठविला

मा.श्री. जोशी अ.सु. :- मा.सभापती साहेबांनी अटी शर्ती विषयी मा.आयुक्त साहेबांना पत्र कधी दिले.

मा.सभापती साहेब :- ठराव तयार करून दिनांक १३/२/२००७ रोजी पाठविला असून जकात जाहीरातीत अटी शर्ती घेणे बाबत पत्र दिनांक १७/२/२००७ रोजी मा.आयुक्त साहेबांना दिलेले आहे.

मा. श्री.त्रिपाठी सु.चं.:- दिनांक १८/२/२००७ रोजी पेपरला जाहीरात पाहिली आहे.

मा.सभापती साहेब :- जकात अधिक्षक श्री.डवरे यांना सभेत बोलवावे.

त्याप्रमाणे जकात अधिक्षक श्री. डवरे एम.एल. सभे मध्ये हजर झाले.

मा.सभापती साहेब :- जकात अभिकर्ता नेमणे बाबत जाहीरात पेपरला कधी आली आहे.

ज.अ.श्री.डवरे एम.एल :- दिनांक १७/२/२००७ रोजी दिली ती दिनांक १८/२/२००७ रोजी पेपरला आली आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- दिनांक ११/२/२००७ रोजी सभा झाली दि.१३/२/२००७ रोजी त्यांचे कडे ठराव पाठविला मा.सभापती साहेबांनी दि.१७/२/२००७ रोजी मा.आयुक्त साहेबांना अटी शर्ती बाबत पत्र दिले दि.१८/२/२००७ रोजी जाहीरात पेपरला आली त्या मध्ये दूरूस्ती करून पुन्हा फेर जाहीरात दिली ती पेपरला कधी आली.

ज.अ.श्री.डवरे एम.एल. :- दिनांक २१/२/२००७ रोजी पेपरला आली आहे.

मा.श्री.त्रिपाठी सु.च.:- आम्ही कार्यवृत्त वाचून घेतो त्या मध्ये चर्चे मधील काय चुकले हे पहातो त्याचा उल्लेख सभेचे कार्यवृत्त कायम करतांना नोंदवून घेतो मा.सभापती साहेबांनी अटी शर्तीचे पत्र दिले त्या प्रमाणे कार्यवाही का झाली नाही.

ज.अ.श्री.डवरे एम.एल. :-अटी शर्ती नमुद करणेस मंजूरी मिळत नाही तो पर्यत आम्ही नमुद करू शकत नाही.

मा.श्री. तिवारी सु.र. :- अटी न टाकणे बाबत अधिका-यांनी सांगितले आहे का ?

मा.श्री. घुले अ.ह. :- अटी नमुद न करणे हा सभापती साहेबांचा अवमान नाही का?

मा.श्री. जोशी अ.सु.:- दिनांक २१/२/२००७ रोजी जाहीरात आली त्यात मा.सभापती साहेबांच्या सुचने प्रमाणे अटी शर्ती आल्या नाहीत.

मा.उपायुक्त श्री.लहाने साहेब :- मा.स्थायी समितीचे ठरावा मध्ये अटी शर्ती असल्या असत्या तर जाहीरातीत त्या आल्या असत्या.

मा.सभापती साहेब :- या अटी शर्ती उल्हासनगर, मीरा भाईदर, कल्याण इत्यादी म.न.पा.चे जकात अभिकर्ता नेमणे बाबतचे टेंडर नोटीसी मधील असुन दिनांक २०/२/२००७ चे मा.महासभेने मंजूर केलेल्या ठरावा मध्ये त्या अटी शर्ती आलेल्या आहेत. मा.स्थायी समितीचे सदस्यांनी माझे कडेस सन २००७-२००८ या साला करिता जकात अभिकर्ता नेमणे विषयी चालू असलेली प्रक्रिया तत्काळ रद्द करून दि.२०/२/२००७ चे अंदाजपत्रकीय सभेत मंजूर केल्या प्रमाणे नवीन अटी शर्तीचा समावेश करून नवीन निविदा मागविणेत यावी अशा बाबत यादी दिलेली आहे. आजचे जनरल बोर्डा मध्ये ही सदर विषयी चर्चा झालेली आहे.

मा.श्री.जोशी अ.सु. व मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- यादी नुसार आयते वेळचा विषय म्हणून ठराव मंजूर करून संबंधीत विभागा कडेस त्वरीत पाठवावा.दिनांक ११/२/२००७रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सदस्यांनी दिलेल्या यादी प्रमाणे चा आयत्या वेळचा विषय म्हणून घेउन सध्या चालू असलेली सन २००७-२००८ साला करिता जकात वसुली साठी जकात अभिकर्ता नेमणे बाबतची निविदा प्रक्रिया तत्काळ रद्द करून दि.२०/२/२००७ रोजीचे अंदाजपत्रकीय सभेत मंजूर झाल्या प्रमाणे नवीन अटी शर्तीचा समावेश करून नवीन निविदा मागविणेस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी. दिनांक २३/१/२००७दिनांक२/२/२००७ व दि.११/२/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/१/२००७, दिनांक २/२/२००७ व दिनांक ११/२/२००७ रोजी च्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- श्री. अविनाश घुले.

अनुमोदक :- श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-२०**
**सन-२००६-२००७**

विषय क्रमांक:-२ दिनांक २८/२/२००७

ठराव क्रमांक:- २ दिनांक २८/२/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सारसनगर येथे व आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर १२ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गतचे पुल बांधणेचे काम सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत करून घेणे बाबत ऑफीस रिपोर्ट आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** विनंती रिपोर्ट की, १२ व्या वित्त आयोगातंर्गत सारसनगर येथे पुल बांधणे व आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सिना नदीवर पुल बांधणेचे काम सार्व.बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत करून घेणे कामी मा.कार्यकारी अभियंता सार्व. बांधकाम विभाग,अहमदनगर यांचे कडेस इकडील जा.नं. सा.बा. १८८० दि.२/२/०७ अन्वये पत्र पाठविले असता त्यांनी जा.क्र.प्रशा/ ११३०/ २००७ कार्या.अभि./ सा.बा.विभाग दि.९/२/०७ अ.नगर अन्वये विषयांकीत कामे सार्व.बांधकाम विभागा मार्फत करावयाची असल्यास खालील प्रमाणे शर्ती नुसार करण्यांत येतील असे कळविले आहे.

**१]** कामांचे अंदाजपत्रके सा.बां. विभागाचे नियमानुसार व दरसुची नुसार असतील.
**२]** कामांचे अंदाजपत्रकीय किमंतीच्या ५% टक्के सेंटेज चार्जेस भरावे लागतील.
**३]** कामासाठीच्या अंदाजपत्रकीय रक्कम पूर्णपणे या कार्यालयाकडे वर्ग झाल्यानंतर काम हाती घेण्यांत येईल

आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर पुल बांधणेचे अंदाज पत्रकीय रक्कम रू.४१,७४,४३०/- (अक्षरी रू.एक्केचाळीस लाख चौ-याहत्तर चारशे तीस मात्र) इतकी आहे. सारसनगर येथे भिंगार नाल्यावर पुल बांधणे या कामाची अंदाजपत्रकीय रक्कम रू.२०.०० लाख इतकी आहे.

उपरोक्त दोन्ही पुलांचे अंदाजपत्रके सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे सन २००५-०६ चे दरसुची नुसार तयार करण्यांत आलेले आहे. दोन्ही कामांची एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ६१,७४,४३०/- इतकी होत आहे.

सार्व.बांधकाम विभाग महा.शासन यांच्या मार्फत दोन्ही पुलाचे बांधकाम करावयाचे असल्यास एकूण अंदाजपत्रकीय रकमेच्या ५% टक्के सेंटेज चार्जेस भरावे लागतील. त्यानुसार एकूण अंदाजपत्रकीय रक्कम रू.६१,७४,४३०/- च्या ५% टक्के रक्कम ३.०८७२२/- (अक्षरी रू. तीन लाख आठ हजार सातशे बावीस मात्र) रक्कम त्यांचे कडेस भरावी लागणार आहे.

तसेच उपरोक्त दोन्ही कामांचे अंदाजपत्रकीय रक्कम रू. ६१,७४,४३०/- प्रथमतः सार्व.बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे कडेस वर्ग करावे लागेल.

तरी १२ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत सारसनगर येथे पुल व आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा दरम्यान सीना नदीवर पुल बांधणेची कामे सार्व. बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मार्फत करून घेणे बाबत व त्या कामी सार्व. बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे कडेस ५%सेंटेज चार्जेस भरणे करिता रू.३,०८,७२२ /- व अंदाजपत्रकीय रक्कम रू.६१,७४,४३०/- वर्ग करणे बाबत आदेशार्थ ऑफीस रिपोर्ट सविनय सादर.

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. आर.जी. मेहत्रे व श्री. एम.डी.काकडे. यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- महानगरपालिके कडे सध्या स्थापत्य अभियंते कमी असून पुलाच्या कामाच्या देखरेखी साठी स्वतंत्र तज्ञअभियंत्याची आवश्यकता आहे. म.न.पाकडे सध्या बांधकाम विभागाकडे चार शाखाअभियंता कार्यरत आहेत त्यांचे कडे वेगवेगळया प्रभागातील कामे स्वतंत्र पणे विभागुन दिलेली आहेत.

सध्य स्थिस्थीत मनपाकडे अभियंते कमी असल्याने सदर काम महाराष्ट्र शासनाच्या सार्व.बांधकाम विभागा कडून अहवालाप्रमाणे करून घेण्यांस हरकत नाही . तथापी निर्णयास्तव सादर दि.१२/२/२००७

अं.लेखा परिक्षक :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे मान्यता देणेस हरकत नाही. दि.१३/२/०७

मा.उपायुक्त साहेब (सा),:-उक्त दोन्ही ही पुलाच्या कामासाठी मोठया प्रमाणात व वेळोवेळी तांत्रिक तपासण्या कराव्या लागणार आहेत. महानगरपालिकेच्या नित्याच्या कामामध्ये पुलांची कामे अत्यंल्प आहेत.उलटपक्षी शासनाच्या सा.बांध. वि.कडून ही कामे मोठया प्रमाणात केली जातात. वरील कामे सार्व.बांध.वि.कडे डिपॉझीट तत्वावर दिल्यास महानगरपालिकेस ५% जादा खर्च होईल. मात्र म.न.पा.कडे तांत्रिक वर्ग अपुरा असल्याने तसेच अधिक्षक अभियंता मुख्य अभियंता यांच्या सारखे वरीष्ठ तांत्रिक अधिकारी नसल्याने ही कामे सा.बां.वि.कडे सोपविणे उचित वाटते मात्र यासाठी स्थायी समितीचा निर्णय येणे उचित राहिल आदेशार्थ सादर. दि.१३/०२/२००७.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

हा विषय वाचून दारवविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र.:- पुलांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करून घ्यावे. मात्र त्यांचे कडेस सर्व पैसे वर्ग करू नयेत त्यांचे टक्केवारी प्रमाणे फक्त रू. तीन लाख त्यांना द्यावे. त्या पुलांचेच काम त्यांचे कडेस द्यावे इतर कामे देउ नयेत

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- म.न.पा.ने नविन पाच इंजिनिअर मानधनावर नेमलेले आहेत. त्यांचे कडून काम करून घ्यावे.

मा.सौ. भागानगरे म.प्र.:- सारसनगर भागातील नागरीकांना पावसाळया मध्ये सारसनगर पुलचा वापर करता येत नाही सदर काम पावसाळया पूर्वी होणे .आवश्यक आहे त्या साठी सदर चे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून हे पुल बांधणेचे काम पावसाळया पूर्वी करून घ्यावे मात्र पुलाचे काम चांगले होण्यासाठी देखदेखी साठी मा.स्थायी समितीचे सदस्यांची एक कमेटी नेमावी.

मा.श्री. मुदस्सर अ.इ. :- पुलांचे काम मनपा मार्फतच करून घ्यावे. पूर्वानुभव असलेल्यांना प्राधान्य देउन ठेका द्यावा व काम करून घ्यावे.

मा.सभापती साहेब :- म.न.पा. मार्फत पुल बांधणेचे काम झालेले नाही.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा कमेटी नेमावी.

मा.सभापती साहेब :-पुलाचे कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी कमेटी नेमावी. कमेटीने पहाणी केल्यानंतर काम चांगले होत नसल्याची कमेटीने तक्रार केली तर काम त्वरीत बंद ठेवले पाहिजे. काम चांगले झाले नाही तर काय करणार.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- काय कार्यवाही करायची या बाबत मा.स्थायी समितीने ठरवावे सदर कामाचा खर्च वाढू शकतो.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- पुलाचे त्रेसष्ठ लाख त्याचे कडेस जमा केल्या नंतर ते आपले कमेटीचा अंकुश मानतील का? पांच लाखा पुढीलची कामे ही त्याचे कडून करावी.

मा.श्री. घुले अ.ह. :- ते पुलांचे नवीन एस्टीमेट करतील.

मा.श्री.तिवारी सु.र. :- एस्टीमेट वाढले तर मंजूरी देणार का.? एस्टीमेट वाढायचे काय कारण

शहर अभियंता श्री . मगर एन्.बी. :- ते त्यांच्या पध्दतीने पुलाचे बांधकाम करतील.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- म.न.पा मार्फत व बी अॅन्ड सी मार्फत होणा-या कामाची पध्दत सारखीच आहे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- आपण एस्टीमेट तयार केले. हा शाखा अभियंत्यानी प्रस्ताव दिला श्री.मगर साहेब आपण त्या वर सही करून पुढे सादर केले हे कुणाचे आदेशाने.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- ते ही जाहीरात प्रसिध्द झाले नंतर.

मा.श्री. तिवारी सु.र. :- आपण पुल बांधू शकतो का.?

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी.: -होय आपण बांधू शकतो.त्यासाठी स्वंतत्र इंजिनिअर नेमणे आवश्यक आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- अशोका ग्रुप अशा मोठया फर्म कडून काम करून द्यावे. म्हणजे काम त्यांचे क्वालीटी सारखे होईल.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मोठया रकमेची मोठी कामे ते करतात. ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा. कामावर देखरेख ठेवणे साठी चार मा.सदस्यांची शहर अभियंत्या सह कमेटी नेमावी. कमेटीचे मंजूरी शिवाय बील पेड करू नये.रू. पांच लाखा पर्यंतची कामे ही त्यांचे मार्फत करावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.चं. :- दहा पुल बांधणारे ठेकेदारास काम द्यावे.सध्याच्या डी एस आर रेट प्रमाणे एस्टीमेट केलेले आहे. त्या पेक्षा दोन पाच लाख जादा खर्च झाल्यास हरकत नाही त्या पेक्षा जादा एस्टीमेट वाढल्यास काम मनपाने करावे. म.न.पा.ने पांच इंजिनिअर मानधनावर नेमलेले आहेत.

मा.सभापती साहेब :- पुलाचे काम चांगले झाले नाही.तर आपली बदनामी होईल. मा.स्थायी समितीचे सदस्यांचे कमेटी कामावर देखरेख करण्यासाठी नेमू.

मा.श्री. मुदस्सर अ.इ. :- माझा ऑफीस रिपोर्ट मंजूरीस विरोध नोंदवावा पुलांचे काम करण्यांस म.न.पा.चे इंजिनिअर समक्ष आहेत. म.न.पा.ने नवीन इंजिनिअरची नेमणूक केली आहे. त्यांचे कडून काम करून घ्यावे.

मा.श्री.जोशी अ.ह.:-हया विषया बाबत काल नवा मराठा मध्ये बातमी आली होती. त्याची माहिती मिळावी.

मा.श्री. घुले अ.ह.:- बातम्या काही ही येतात.

मा.श्री. मैड स.ब.:- वाढीव एस्टीमेट मंजूर करू नये.

मा.श्री. तिवारी सु.र. :- आपली कमेटी प्रशासकीय प्रतिनिधी म्हणून शहर अभियंता श्री.मगर साहेब एन्.बी.यांनी कामाची पहाणी केल्या नंतर वाढीव एस्टीमेटला मंजूरी देणे बाबत पुढील कार्यवाही करावी

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- दोन चार लाखाचे वाढीव खर्चास मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समितीचे सदस्य. मा.श्री.त्रिपाठी सु.चं., मा.श्री. घुले अ.ह., मा.श्री. तिवारी .सु.र.व शहर अभियंता अहमदनगर, महानगरपालिका व सभापती, स्थायी समिती यांची पुलांचे बांधकामावर नियंत्रण ठेवणे कामी कमेटी नेमणेत यावी. ऑफीस रिपोर्ट मंजूर करणेत यावा तसेच सदर पुलांचे बांधकामाचे एस्टीमेट वाढले तर तसा प्रस्ताव मंजूरी साठी मा.स्थायी समिती पुढे सादर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सारसनगर येथे व आयुर्वेद कॉर्नर ते काटवन खंडोबा रोड दरम्यान सीना नदीवर १२ व्या केंद्रीय वित्त आयोगा अंतर्गत पुल बांधणेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत करून घेणे. बाबतचे कार्यालयीन प्रस्तावावर सभे मध्ये झालेल्या साधक बाधक चर्चे नुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

सदरचे पुल बांधणेचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग महाराष्ट्र शासन यांचे मार्फत पावसाळया पुर्वी करून घेणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफीस रिपोर्ट मंजूर.

सदर पुलांचे कामाचा खर्च वाढल्यास वाढीव खर्च मंजूरी साठी प्रस्ताव मा.स्थायी समिती कडेस सादर करण्यांत यावा. तसेच सदर पुलाचे कामाचे पहाणी साठी. त्यावर नियंत्रण ठेवणे कामी

मा.श्री. त्रिपाठी सु.च.,मा.श्री. घुले अ.ह.,मा.श्री. तिवारी .सु.र.,व सभापती स्थायी समिती आणि कार्यालयीन प्रतीनिधी म्हणून शहर अभियंता यांची कमेटी नेमण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सदर प्रस्तावाचे मंजूरीस मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. सदस्य स्थायी समिती यांचा विरोध.

सुचक :- मा.सौ. भागानगरे म.प्र.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव बहुमताने मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.